| MHSO140002952021 | दाखल दिनांकः | २८/०१/२०२१ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांकः | २९/०१/२०२१ | | |
| | निकाल दिनांकः | १८/०३/२०२६ | | |
| | कालावधीः | व. | म. | दि. |
| | | ०५ | ०१ | १८ |

**निशाणी क्र. ४३**

# <u>भाग 'अ'</u>

**<u>बार्शी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कोर्ट नं.१ यांचे न्यायालयात</u>**

**( पिठासीन अधिकारी श्रीमती पी.व्ही. राऊत )**

| | | |
|---|---|---|
| केस नंबर | :- | **नियमित फौज. खटला क्र. ४६/२०२१** |
| अपराध क्रमांक व पोलीस स्टेशन | :- | गु.र.नं. ०७/२०२०<br>पांगरी पोलीस स्टेशन, पांगरी,<br>ता.बार्शी जि.सोलापूर. |
| **फिर्यादी** | **:-** | **महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पांगरी पोलीस स्टेशन, पांगरी,<br>ता.बार्शी जि.सोलापूर.** |
| **फिर्यादीतर्फे वकील** | :- | श्री. ए.बी. क्षिरसागर, सहाय्यक सरकारी वकील |
| **आरोपी** | :- | **१) मारुती विठ्ठल वाकडे,**<br>वयः- ५५ वर्षे, धंदाः- शेती,<br>रा. पांगरी, ता.बार्शी जि.सोलापूर<br>**२) बंडु उर्फ विशाल भारत वाकडे,**<br>वयः- २५ वर्षे, धंदाः- शेती,<br>रा. उक्कडगाव, ता.बार्शी जि.सोलापूर |
| **आरोपीतर्फे वकील** | :- | श्री. ए.आर. पाटील |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | १३/०१/२०२० |
| प्रथम खबर दिल्याची तारीख | १३/०१/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | २८/०१/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १७/१०/२०२३ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | १८/०८/२०२५ |
| खटला न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | १८/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १८/०३/२०२६ |
| शिक्षेचा आदेश असल्यास, | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला शिक्षा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेल्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मारुती विठ्ठल वाकडे, | दिनांक १५/०१/२०२० रोजी फौज.प्र.स.कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस दिली. | | भा.द.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | आरोपीची निर्दोष मुक्ताता झाली. | -- | -- |
| २) | बंडु उर्फ विशाल भारत वाकडे | दिनांक १५/०१/२०२० रोजी फौज.प्र.स.कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस दिली. | | -वरीलप्रमाणे- | आरोपीची निर्दोष मुक्ताता झाली. | -- | -- |

# भाग 'क'

## सरकारी साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

### अः- सरकारी साक्षीदारः-

| दर्जा | साक्षीदाराचे नाव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | समिर अल्लामीन शेख (नि.क्र.२६) | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | अब्दुल दगडु मुलाणी (नि.क्र.३४) | फिर्यादी |

### ब- बचाव पक्षाचे साक्षीदार :- नाही

### क- न्यायालयातर्फे साक्षीदार :- नाही

## सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.

### अ. सरकार पक्षातर्फेः-

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१९ | दोषारोप |
| २. | निशाणी क्र.२७ | घटनास्थळ/जप्ती पंचनामा (सा.क्र.१ समिर शेख यांच्या पुराव्यातुन सिध्द) |
| ३. | निशाणी क्र.३५ | फिर्यादवरील फिर्यादीचा अंगठा (सा.क्र.२ अब्दुल मुलाणी यांच्या पुराव्यातुन सिध्द) |
| ४. | निशाणी क्र.४१ आणि ४२ | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये आरोपींचा जबाब |

### ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.३६ | अब्दुल दगडु मुलाणी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

### क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः-

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.३३ | तडजोड पुरसिस |

**ड. जप्त वस्तुंचे वर्णनः-**

| अ.क्र. | वस्तुंचा नंबर | वस्तुंचे वर्णन |
|---|---|---|
| १. | जी.एम.आर. नं.२४/२०२४ | एक लाकडी काठी ७५ सेंमी लांबीची |

## :: न्यायनिर्णय ::

(निकाल दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी घोषित.)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये सदरचे प्रकरण चालविले आहे.

**०२] अभियोग पक्षाचे म्हणणे थोडक्यात असे की** :-

फिर्यादी नामे अब्दुल दगडु मुलाणी हे पांगरी, ता.बार्शी जि.सोलापूर येथील रहिवासी असुन दिनांक १३/०१/२०२० रोजी ते त्यांची जनावरे घेऊन शेताकडे जात असताना मारुती मंदिराच्या पाठीमागे ओढयाजवळ काही महिला तेथे कपडे धुवत होत्या व त्यावेळी फिर्यादीच्या पायास खाजवल्यामुळे त्यांनी तेथे त्यांचा पाय खाजवला व त्यांच्या शेतात शेळया घेऊन निघुन गेले. त्यावेळी तेथे गावातील मारुती विठ्ठल वाकडे व बंडु भारत वाकडे हे तेथे आले व दोघेही फिर्यादीस शिवीगाळ करु लागले. त्यावेळी मारुती वाकडे यांनी फिर्यादीच्या अंगावर धावत येऊन "तु मारुतीच्या मंदिराच्या पाठीमागे ओढयाच्याजवळ असलेल्या डांबरी रस्त्यावर माझी पत्नी कपडे धुवत असताना माझ्या पत्नीकडे बघुनच पाय खाजवला आहेस" असे म्हणुन गैरसमज करुन घेवुन त्याच्या हातातील लोखंडी गजाने फिर्यादीला मारहाण करु लागला. तेवढयात बंडु भारत वाकडे हा फिर्यादीस काठीने मारु लागला. त्यावेळी हनुमंत दत्तात्रय गोडसे हा त्यांचे भांडण पाहुन पळत आला व त्याने त्यांचे भांडण सोडवले. त्यावेळी आरोपींनी, ‘तुला आता सोडुन देतो, परत जिवंत सोडणार

नाही' अशी धमकी देऊन निघुन गेले. सदर मारहाणीमध्ये फिर्यादीच्या डाव्या हातावर, डाव्या पायाच्या गुडघ्यावर व उजव्या हाताच्या अंगठयाजवळील बोटाला मार लागुन जखम झाल्याने ग्रामीण रुग्णालय पांगरी येथे उपचार घेतला. सदरच्या प्रकारामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दाखल केली.

**०३]** गुन्हयाची नोंद झाल्यानंतर तपासी अधिकारी पो.ना. श्री. एम.एम. जाधव, ब.नं.१२४६, पांगरी पोलीस स्टेशन यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, मुद्देमाल जप्त केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपास पुर्ण झाल्यानंतर ठाणे अंमलदार, पांगरी पोलीस स्टेशन यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४]** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये निशाणी क्र.१९ वर दोषारोप ठेवले, ते त्यांना वाचुन व समजावुन सांगितले ते त्यांनी नाकबुल करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यात आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्र.४१ व ४२ प्रमाणे नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या विरोधातील सर्व कथने नाकारुन खोटी केस केली असल्याचे कथन केले आहे.

**०५]** खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यावर मी खालील प्रमाणे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | दिनांक १३/०१/२०२० रोजी दुपारी ०२.३० वाजण्याच्या सुमारास, मौजे पांगरी, ता.बार्शी | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | जि.सोलापूर येथील मारुती खबाल यांच्या शेतात, आरोपींनी आपसांत संगनमत करुन, फिर्यादी यांना लोखंडी गजाने व लाकडी काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | |
| २. | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी आपसांत संगनमत करुन, फिर्यादी यांना शिवीगाळी करुन शांतताभंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने त्यांचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग किंवा अन्य कोणताही अपराध घडु शकला असता व त्याव्दारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| ३. | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी आपसांत संगनमत करुन, फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली व दमदाटी केली व त्याव्दारे त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| ४. | हुकूम व आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

**०६]** आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने उपरोक्त नमुद भाग 'क' प्रमाणे एकुण दोन साक्षीदार तपासले आहेत. तसेच निशाणी क्र.३७ वर पुरसीस दाखल करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबतः-</u>**

**०७]** अभियोग पक्षाचे कथनानुसार दिनांक १३/०१/२०२० रोजी दुपारी ०२.३० वाजताच्या सुमारास आरोपींनी आपसांत संगनमत करुन फिर्यादी यांना लोखंडी गजाने व लाकडी काठीने मारहाण करुन जखमी केले व शिवीगाळ करुन दमदाटी केली.

**०८]** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.०२ अब्दुल दगडु मुलाणी (फिर्यादी) यांचा पुरावा निशाणी क्र.३४ वर नोंदविला आहे. फिर्यादी यांच्या पुराव्यानुसार, दिनांक १३/०१/२०२० रोजी मारुती वाकडे व त्यांच्या मध्ये किरकोळ कुरबुर झाली होती, त्यामुळे गैरसमजुतीमधुन त्यांनी आरोपींविरुध्द फिर्याद दिली होती, आरोपींनी घटनेच्या वेळी त्यांना लोखंडी गजाने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली असे काही घडले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. फिर्यादीने फिर्यादवरील फक्त त्यांचा अंगठा ओळखला असुन त्यामधील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुतच्या साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने सहा.सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले असता अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही कथन साक्षीदाराने केले नाही. उलटपक्षी आरोपींमध्ये व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच आरोपींच्या विधीज्ञांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी त्यांचे व आरोपींचे वाद मिटले असल्याचे व त्यांना आता आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे मान्य व कबुल केले आहे.

**०९]** घटनेतील घटनास्थळ सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार समिर अल्लामीन शेख (साक्षीदार क्र.१, निशाणी क्र.२६) यांचा पुरावा नोंदविला. त्यांच्या पुराव्यानुसार, दिनांक १४/०१/२०२० रोजी त्यांना पांगरी पोलिसांनी पांगरी येथे घटनास्थळी

बोलावले होते, घटनास्थळ पांगरी-पाथरी रस्त्यावर होते, पोलिसांनी त्यांच्या समक्ष एक काठी घटनास्थळावरुन जप्त केली, पोलिसांनी त्याप्रमाणे घटनास्थळ, जप्ती पंचनामा (निशाणी क्र.२७) तयार केला, त्यावर त्यांची सही अनुक्रमांक दोन वर असल्याचे कथन केले आहे. आरोपीच्या विधीज्ञांनी प्रस्तुत साक्षीदाराचा उलटतपास नोंदविला असता त्यामध्ये त्यांनी जप्त केलेली काठी न्यायालयासमोर नसल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांनी पांगरी पोलीस स्टेशनच्या हजार प्रकरणांमध्ये साक्ष दिल्याचे व त्यांचे हॉटेल पांगरी पोलीस स्टेशनच्या समोर असल्याचे व त्यामुळे पोलीस त्यांना बोलावतात व पंचनाम्यावर सहया घेत असल्याचे मान्य व कबुल केले आहे.

**१०]** आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपा अंतर्गत आवश्यक बाबी साक्षीदारांच्या पुराव्यातुन सिध्द होणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणात घटनेतील जखमी साक्षीदार तथा फिर्यादी यांनीच अभियोग पक्षास सहकार्य केलेले नसुन त्यांनी सदरची घटना नाकारलेली आहे. तसेच फिर्यादी यांनी जरी सरतपासात त्यांची व आरोपींची किरकोळ कुरबुर झाल्याचे कथन केले असले तरी आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी त्यांचे व आरोपींचे वाद मिटले असुन आरोपींविरुध्द त्यांची तक्रार नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे व तशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.३३) त्यांनी अभिलेखावर दाखल केली असुन त्यावरील त्यांच्या सहया त्यांनी मान्य केल्या आहेत.

**११]** एकंदरीतच अभिलेखावर आलेला फिर्यादी यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ व दमदाटी करुन लोखंडी गजाने व लाकडी काठीने मारहाण करुन जखमी केले याबाबतचा कोणताही पुरावा तोंडी पुराव्यातुन अभिलेखावर आलेला नाही. जरी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिध्द केला असला तरी स्वतः जखमी तथा फिर्यादी यांनी सदरची घटना नाकारली आहे. तसेच फिर्यादी

व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाल्याबाबतची पुरसीस देखील अभिलेखावर दाखल केली आहे. एकंदरीतच आरोपींविरुध्द दोषारोप शाबीत होण्याइतपत कोणताच पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने अभियोग पक्षाने आरोपींचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द केला नाही. सबब, अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा शाबित करणारा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. सबब, आरोपींविरुध्द कायदेशीर तरतुदींनुसार कोणताही गुन्हा शाबित होत नसल्याने मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबतः-</u>**

**१२]** प्रस्तुत प्रकरणात दोषारोप पत्र आरोपींविरुध्द दाखल करण्यात आलेले असून फिर्यादी यांच्या पुराव्यात आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे कथन केले आहे. फिर्यादी यांचा तोंडी पुरावा तसेच फिर्यादीने दाखल केलेले तडजोड पत्र पाहता त्यांची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे दिसून येते. तसेच, उलटतपासात हे देखील मान्य केले आहे की, त्यांच्या व आरोपींमध्ये तडजोड झालेली आहे. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करता प्रस्तुत प्रकरण प्रलंबित ठेवणे उचित होणार नाही.

**१३]** आरोपींविरुध्द कुठलाही सबळ पुरावा आरोपींचा संबंध गुन्ह्याशी जोडण्याइतपत अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आलेला नाही. याकामी सादर केलेल्या एकंदरीत पुराव्यावरुन तक्रारदाराने तक्रारीत नमूद केलेली परिस्थिती आरोपींमुळे ओढावली असे म्हणता येणार नाही. सहाजिकच आरोपी यांनी गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष निःसंशयरित्या सिध्द करु शकलेला नाही असे म्हणणे भाग आहे. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र राहील. त्यामुळे आरोपींकडून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम

४३७-अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/- चा जामीन घेण्यात आला. सबब, मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.**१) मारुती विठ्ठल वाकडे** आणि **२) बंडु उर्फ विशाल भारत वाकडे,** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ च्या शिक्षापात्र गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे प्रत्येकी रुपये ७,५००/- चे बंधपत्र दयावे.

४. जप्त मुद्देमाल एक लाकडी काठी ७५ सेंमी लांबीची ही मुल्यहीन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर त्यांचा नाश करण्यात यावा.

५. या न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित व टंकलिखित करण्यात आला.)

PADMASHRI VASANT RAUT
Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2026.03.18 17:43:54 +0530

बार्शी. **(श्रीमती पी.व्ही. राऊत)**
दिनांकः १८/०३/२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बार्शी.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule,<br>Stenographer Grade-III |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>Jt.C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 18/03/2026 |
| (d) | Judgment /Order checked on | : | 18/03/2026 |
| (e) | Judgment /Order signed by P.O. on | : | 18/03/2026 |
| (f) | Judgment /Order uploaded on | : | 18/03/2026 |